**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांक:13.03.2025** **वार : गुरुवार**

---

**ठळक बातम्या**

1) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मॉरिशसचा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान
मॉरिशस बरोबर भारताचे अनेक सामंजस्य करार
2) जास्त व्याजदर देणाऱ्या योजनांच्या आमिषाला नागरिकांनी बळी पडू नये मुख्यमंत्र्यांचं आवाहन
3) जन्म – मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळवण्याची प्रक्रीया सुलभ आणि पारदर्शक करण्यासाठी नवे नियम लागू
आणि
4) राज्य सरकारच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेचं उद्दीष्ट महावितरणनं 82 दिवसात केलं पूर्ण

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना काल 'द ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द स्टार अँड की ऑफ इंडियन ओशन' हा मॉरिशसचा सर्वोच्च नागरी सन्मान - प्रदान करण्यात आला. पंतप्रधान काल मॉरिशसच्या 57 व्या राष्ट्रीय दिनाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. भारत आणि मॉरिशसमधल्या ऐतिहासिक नात्याचा हा सन्मान असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. हा सन्मान मिळवणारे पंतप्रधान मोदी हे पहिले भारतीय असून त्यांना इतर देशांकडून मिळालेला हा 21वा सर्वोच्च नागरी सन्मान आहे. मॉरिशसचे पंतप्रधान नवीन रामगुलाम यांच्यासोबत मोदी यांनी काल प्रतिनिधी स्तरावर चर्चा केली. यावेळी - दोन्ही देशांदरम्यान - स्थानिक चलनात देवाण घेवाण, कर्ज पुरवठा, राजदूत प्रशिक्षण, बंदर व्यवसाय माहिती देवाणघेवाण, आर्थिक गुन्हे, सूक्ष्म-लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्र सहकार्य, अधिकारी प्रशिक्षण यासारख्या विषयांवर 8 सामंजस्य करार झाले.

**विधिमंडळ**

शक्तीपीठ महामार्गाला विरोध असणाऱ्या शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन, चर्चेतून मार्ग काढून हा महामार्ग उभारला जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. या महामार्गाविरोधात कोल्हापुरातले शेतकरी मुंबईत आझाद मैदानात आंदोलन करत असल्याचा मुद्दा, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी विधान परिषदेत उपस्थित केला, त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी शासनाची भूमिका मांडली. शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्याच्या मागणीसाठी 12 जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांनी काल मुंबईत आझाद मैदानावर

आंदोलन केलं. मात्र , कोल्हापूरमध्ये या महामार्गाला शेतकऱ्यांचं समर्थन वाढत असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. राज्याच्या विकासाबाबत महत्त्वाच्या असलेल्या या महामार्ग उभारणीसाठी विरोधकांनी सहकार्य करावं, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं.

राज्यातील जनतेनं  जास्त व्याज देणाऱ्या योजनांच्या अमिषाला बळी पडू नये, असं  आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानपरिषदेत केलं. सदस्य शशिकांत शिंदे यांनी टोरेस घोटाळा प्रकरणी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर  देताना मुख्यमंत्री बोलत होते. मुख्यमंत्री म्हणाले----
**कोणी आपल्या खिशातून पैसे टाकत नाही पैसे झाडाला लागत नाही . बँकेपेक्षा १ टक्का २ टक्का ३ टक्का पर्यंत कोणी देऊ शकत त्यावरती जर कोणी देत असेल तर हे लक्षात घेतलं पाहिजे की हे त्यामध्ये परावर्तीत होणार आहे, त्यामुळे लोकांनीही जास्त व्याज मिळत आहे या सबबी खाली अशा प्रकारच्या गुंतवणुका करू नयेत अशा प्रकारची आमची जनतेला विनंती आहे.**

प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींवरील बंदीसंदर्भात, डॉक्टर अनिल काकोडकर यांच्या समितीचा अहवाल येईपर्यंत या मूर्तींच्या परवानगीला मुदत देण्याची विनंती न्यायालयाला करणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी विधानपरिषदेत सांगितलं. राज्यात अभियांत्रिकी, कृषी विषयक तांत्रिक पदांच्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग अर्थात MPSC कडून घेण्यात येणाऱ्या सर्वच स्पर्धा परीक्षा मराठीमध्ये घेण्याबाबत राज्य शासनाचं नियोजन असल्याची माहितीही फडणवीस यांनी दिली. मिलिंद नार्वेकर यांनी यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री बोलत होते.-

भिवंडीतील माता आणि बाल रुग्णालयाच्या बांधकामाला गती देणार असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी काल विधानसभेत दिली.
राज्यात विक्री होत असलेलं कृत्रिम पनीर आणि चीज नागरिकांच्या आरोग्यासाठी धोक्याचं असून  ते विक्री करणारे विक्रेते आणि संबंधितांवर कडक कारवाई करण्याचा इशारा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिला. त्यासाठी, या नमुन्यांची तपासणी करून त्याचं विश्लेषण करणाऱ्या अन्न आणि  औषध प्रशासनाच्या नवीन प्रयोगशाळा तसंच प्रयोगशाळांच्या बळकटीकणासाठी भरीव निधी देण्यात येईल असंही त्यांनी सांगितलं. अंगणवाडी सेविका आणि पर्यवेक्षिकांच्या  प्रोत्साहन भत्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यात आल्याची माहिती  महिला आणि बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी काल विधानसभेत दिली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना 2100 रुपये मदत देण्याचा निर्णय योग्य वेळी घेतला जाईल असं महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी काल विधानसभेत सांगितलं. समाधानकारक उत्तर न मिळाल्यानं प्रश्न विचारण्याची परवानगी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी मागितली. मात्र विधानसभा अध्यक्षांनी ती फेटाळून लावत पुढचं कामकाज सुरू केलं. त्यामुळे विरोधी पक्षाच्या सदस्यांनी घोषणाबाजी करत सभात्याग केला.

**बावनकुळे**
जन्म मृत्यूच्या बोगस प्रमाणपत्रांना चाप लावण्यासाठी जन्म मृत्यू नोंदणी अधिनियमात सुधारणा करण्यात आली असून, शासन निर्णयानुसार महाराष्ट्रात हे नवीन बदल तात्काळ लागू झाले असल्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात केली. त्यामुळे सरकारी व्यवस्थेतल्या उणीवांचा लाभ घेत जन्म - मृत्यू नोंदणीची प्रमाणपत्रं मिळविणाऱ्या परदेशी नागरिकांवर आता अंकुश बसणार आहे. दरम्यान, रत्नागिरी जिल्ह्याच्या खेड तालुक्यात बांधकाम सुरू असलेल्या इमारतीत बेकायदा वास्तव्य केलेल्या एका बांगलादेशी नागरिकाला दहशतवादविरोधी शाखेनं अटक केली. त्याच्याविरुद्ध खेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, चार दिवसांची पोलीस कोठडी घेऊन अधिक तपास केला जात आहे. विधानसभेत काल अर्थसंकल्पावर चर्चा झाली. मोठ्या मताधिक्यानं निवडून आलेल्या महायुती सरकारनं अर्थसंकल्पातून जनतेला काहीही दिलं नाही, अशी टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार वरुण सरदेसाई यांनी केली. तर राज्यात होणारी गुंतवणूक कुठे होणार हे सरकारने स्पष्ट केलं पाहिजे अशी अपेक्षा काँग्रेसचे आमदार अमित देशमुख व्यक्त केली.

**सूर्यघर**
राज्य सरकारच्या पहिल्या शंभर दिवसांत प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या लाभार्थ्यांची संख्या सव्वा लाखापेक्षा अधिक करण्याचं आणि एकंदर वीजनिर्मिती क्षमता 500 मेगावॅट करण्याचं उद्दीष्ट महावितरणनं 82 दिवसात पूर्ण केलं आहे. 82 दिवसात 57 हजारहून अधिक घरांवर सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविण्यात आले. या योजनेत आतापर्यंत राज्यातल्या लाभार्थी कुटुंबांना एकंदर 800 कोटी रुपयांचं अनुदान त्यांच्या खात्यात थेट देण्यात आलं आहे. यामध्ये नागपूर प्रथम तर पुणे दुसऱ्या क्रमांकावर आहे अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.

**यशवंतराव चव्हाण**
महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त त्यांना काल राज्यभरात आदरांजली वाहण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान भवनातील यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. कराड इथं प्रीतीसंगम समाधी स्थळावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुष्पहार अर्पण करून आदरांजली अर्पण केली. मंत्रालयात कौशल्य आणि रोजगार मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. राजधानी दिल्लीतही यशवंतराव चव्हाण यांची जयंती दोन्ही महाराष्ट्र सदनात साजरी करण्यात आली.

**राणे मत्स्य व्यवसाय**

दुबई आणि सिडनीच्या धर्तीवर, अंधेरी पूर्व इथल्या मरोळ मध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचा मासळी बाजार आणि कोळी भवन उभारण्याचे निर्देश मत्स्यव्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. मंत्रालयात काल  यासंदर्भात झालेल्या आढावा बैठकीत ते  बोलत होते. मरोळ परिसरातील कोळी बांधवांचा पारंपरिक व्यवसाय आणखी आधुनिक आणि जागतिक बाजारपेठेत सक्षम होण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे, असंही त्यांनी यावेळी सांगितलं.

**तटकरे**

शासन महिलांना विविध सुविधा देण्यास सकारात्मक असून, महिलांच्या सर्वांगिण प्रगतीसाठी सदैव प्रयत्नशील असल्याचं  प्रतिपादन महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केलं. मुंबईत महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघांच्या वतीनं आयोजित महिला दिन कार्यक्रमात त्या काल बोलत होत्या. नोकरदार महिलांच्या आरोग्यासाठी नियमित आरोग्य तपासणी, विपश्यना शिबिरं , स्वच्छ विश्रांतीगृहं  आणि स्वच्छतागृहांसारख्या सोयीसुविधांची अंमलबजावणी शासनामार्फत करण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचं तटकरे यांनी यावेळी सांगितलं.

**शिमगा**

रत्नागिरी जिल्ह्यातल्या 24 पैकी 19 गावांमध्ये - शिमगोत्सवाच्या  मानपानावरून आणि पूजेवरून असलेले वाद - सामोपचाराने मिटले आहेत. त्यामुळे आता या 19 गावांमध्ये  शिमगोत्सव एकोप्याने आणि शांततेत साजरा होत आहे. पोलिसांनी घेतलेला पुढाकार, शांतता समितीच्या बैठका, आणि गावभेटिंमुळे  हे शक्य झालं आहे. अन्य गावांमध्येही वाद मिटवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान जिल्ह्यातल्या 2 गावांमध्ये मात्र कलम 163 अन्वये उत्सव साजरा करण्यावर निर्बंध घालण्यात आल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी यांनी दिली.

**कुंभ मेळा नाशिक**

नाशिक मध्ये भरणाऱ्या आगामी  कुंभमेळ्यासाठी राज्य शासनानं नाशिक मधल्या  बाह्य रिंग रोड सह प्रमुख 12 रस्त्यांसाठी 2 हजार 270 कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली आहे. यामध्ये प्रमुख रस्त्यांचं मजबुतीकरण आणि नाशिक- त्रंबकेश्वर रस्त्याचं  24 मीटर रुंदीकरण करण्यात येणार आहे. या कामासाठी 350 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याची माहिती नाशिकचे विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी काल कुंभमेळा पूर्वतयारीच्या बैठकीत दिली.

**हवामान**

हवामान - येत्या 2 दिवसात विदर्भात उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. अकोल्यात काल  सर्वाधिक 39 पूर्णांक 5 अंश सेल्सियस तपमानाची नोंद झाली. उर्वरित राज्यात तापमान सरासरीच्या जवळपास राहील असं पुणे वेधशाळेनं म्हटलं आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं नमस्कार